पंढरपूरचा रविराज चव्हाण ४७व्या अखिल भारतीय त्रिमूर्ती केसरीचा मानकरी ठरला. त्याने करमाळ्याच्या जय पाटीलचा सहा विरुध्द तीन गुणाने पराभव केला. अटीतटीच्या स्पर्धेत रविराज चव्हाण व जय पाटील यांनी पहिल्या वीस मिनिटात एकमेकाची ताकद आजमावली. यानंतर सहा मिनिटाच्या गुणावर रविराजने चपळाईने ६ गुण तर जय पाटील याने २ गुण मिळवले.

विजेत्या रविराजला दोन लाख तर उपविजेता जय पाटील यास दीड लाख व सन्मानचिन्ह देण्यात आले. निमगाव के. येथील सागर देवकाते याने तृतीय तर माळशिरसचा आर्यन पाटील याने चौथे स्थान मिळविले. त्यांना अनुक्रमे एक लाख व ५० हजार रुपये व सन्मान चिन्ह देण्यात आले. सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या जयंती निमित्तजयंती समारंभ समिती व प्रताप क्रीडा मंडळ यांच्या वतीने शंकरनगरच्या शिवतीर्थ आखाड्यात ही स्पर्धा पार पडली. जयंती समितीचे संस्थापक जयसिंह मोहिते पाटील, अध्यक्ष मदनसिंह मोहिते-पाटील, प्रताप क्रीडा मंडळाच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व स्पर्धाप्रमुख सयाजीराजे मोहिते पाटील यांच्या नेतृत्वाखाली ही स्पर्धा पार पडली. यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, संस्थापक जयसिंह मोहिते पाटील, अध्यक्ष मदनसिंह मोहिते पाटील, आ. रणजीतसिंह मोहिते पाटील, खा. धैर्यशील मोहिते पाटील, उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते पाटील, स्पर्धाप्रमुख सयाजीराजे मोहिते पाटील, आ. अभिजीत पाटील, माजी आ. लक्ष्मणराव ढोबळे, जयवंत जगताप, भगीरथ भालके, डॉ. अनिकेत देशमुख, वसंत देशमुख, भारत शिंदे, राष्ट्रीय पंच राम सारंग, मल्ल सम्राट रावसाहेब मगर, महाराष्ट्र केसरी रावसाहेब मगर, व्हा. चेअरमन शंकरराव माने देशमुख, वसंत जाधव आदी उपस्थित होते. युवराज केचे व सुकुमार माळी यांनी सूत्रसंचालन केले. पोपट भोसले पाटील यांनी स्वागत केले. बिभिषन जाधव यांनी आभार मानले. या स्पर्धेसाठी पंच म्हणून राष्ट्रकूल स्पर्धेचे विजेते, राष्ट्रीय कुस्तीचे पंच राम सारंग यांचेसह नितीन शिंदे, अनिल बाबर, चंद्रकांत मोहोळ, तानाजी केसरे, वैभव तेली, महेश पाटील, गोरख पाटील, महेश जाधव, माणिक पाटील, बाजीराव पाटील, प्रवीण निकम अकलूज येथील विराज निंबाळकर, भोजराज माने, बाजीराव सरगर, गणेश शिंदे, अशोक शिंदे व काका जगदाळे यांनी काम पहिले. यांचा सत्कार करण्यात आला.

**विविध वजनी गटातील विजेते**

२५ किलो : आदर्श चव्हाण (खुडूस) ,२८ किलो : अर्णव भुसारे (दिघंची), ३0 किलो: करण गायकवाड (खुडूस),३२ कि.: करण नरके(खुडूस), ३५ किलो : मेघराज तांबिले(अकलूज), ४0किलो : संस्कार जाधव(खुडूस), ४५ किलो : सुधीर खवळे (माळशिरस), ५0 किलो : यशराज मोरे (खुडूस), ५५ किलो : सौरभ नरुटे (खुडूस), ६0 किलो : विशाल सुरवसे (खुडूस), ६५ किलो : अविराज माने (खुडूस), ७0 किलो : रणजित गोरड (म्हसवड), ७५ किलो : सोमनाथ गोरड (म्हसवड), ८0 किलो : राहुल कोरडे (मायणी), ८५ किलो : प्रकाश कोळेकर (सदाशिवनगर).

# सोलापूरला सांघिक विजेतेपद

## राज्य प्रौढ गट टेबल टेनिस स्पर्धा : मनीष रावत अजिंक्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जानेवारी -**

राज्यस्तरीय प्रौढ गट टेबल टेनिस स्पर्धेत सोलापूरने विजेतेपद पटकाविले. यात मनीष रावत, आनंद कुलकर्णी, आत्माराम गांगर्डे व बसाब चौधरी यांचा समावेश आहे. तसेच वैयक्तिक ५0 वर्षावरील गटात मनीष रावत यांनी अजिंक्यपद पटकावले. अन्य गटातील विजेत्यांमध्ये पुणे, मुंबई, ठाणे, नाशिक, कोल्हापूर व नागपूर येथील स्पर्धकांचा समावेश आहे.



विजापूर रोडवरील सुयश गुरुकुलमधील आत्मन क्रीडा संकुलात झालेल्या या स्पर्धेत पुरुष सांघिक गटात अंतिम सामन्यात ४0 वर्षावरील गटात सोलापूरने मुंबई संघाचा ३-१ असा पराभव केला. त्याचबरोबर पुरुष एकेरीच्या सामन्यात मनीष रावत यांनी मुंबईच्या शरद ग्रोवर याचा ३-0 असा पराभव करून सुवर्ण पदक प्राप्त केले.

या स्पर्धेचे उद्घाटन उद्योगपती यतीन व सुहासिनी शहा यांच्या हस्ते झाले. यावेळी महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस प्रौढ संघटनेचे अध्यक्ष राजीव व स्मिता बोडस, सुयश गुरुकुलचे संस्थापक विद्या केशव शिंदे, सोलापूर जिल्हा टेबल टेनिस संघटनेचे अध्यक्ष डॉ. राजीव प्रधान आदी उपस्थित होते. बक्षीस वितरणाचा महाराष्ट्र राज्य प्रौढ टेबल टेनिस संघटनेचे सेक्रेटरी जनरल यतीन टिपणीस यांच्या हस्ते झाले. ही स्पर्धा प्रिसिजन कंपनी, बालाजी अम ईन्स व एनटीपीसी यांनी पुरस्कृत केली होती. यात राज्यातील पाचशे स्पर्धकांनी भाग घेतला होता. ही स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्याकरिता सोलापूर टेबल टेनिस असोसिएशनचे डॉ. नितीन तोष्णीवाल, डॉ. नीलकंठ पोद्दार, अनंत कुलकर्णी, सुजित जवळेकर, डॉ. शशांक लिगाडे, प्रियदर्शन शहा, अलमेडा ऑबेरी, गोवर्धन, समीर शेख, झेड. एम. पुणेकर यांचे सहकार्य लाभले.

**विविध गटाचे अंतिम निकाल** : सांघिक : पुरुष : ६0+ : टीम डीजी मुंबई विजयी विरुद्ध रॉक सॉलिड टीम मुंबई. महिला : सावेज गर्ल्स विजयी विरुद्ध साव्हेज ग्रुप.

एकेरी : महिला : ७0+ : विना जोशी व नीता विजयी विरुद्ध मनीषा बोडस. ६५+: रंजना पत्की विजयी विरुद्ध उज्वला मराठे. ६0+: नीता कुलकर्णी विजयी विरुद्ध स्वाती आधारकर. ५५+: शिल्पा जोशी विजयी विरुद्ध अनघा जोशी. ५0+ : सुषमा मोगरे विजयी विरुद्ध मुनमुन मुखर्जी. ४५+ : राधिका डोरले विजयी विरुद्ध श्रुती जोशी. ४0+ : मयुरी दीक्षित विजयी विरुद्ध प्रियांका घुमरे.

पुरुष : ८0+ : सुबोध देशपांडे विजयी विरुद्ध सतीश शिरसाथी. ७५+ : पिनायकीन संपत विजयी विरुद्ध दिलीप कुडतरकर. ७0+ : शिवानंद कुंदा जे विजयी विरुद्ध योगेश देसाई. ६५+ : जयंत कुलकर्णी विजयी विरुद्ध प्रकाश केळकर. ६0+ : संजय जैन विजयी विरुद्ध अतुल देशमुख. ५५+ : बसाब चौधरी विजयी विरुद्ध प्रसाद नाईक. ५0+ : मनीष रावत विजयी विरुद्ध शरद ग्रोवर. ४५+ : सुहास राणे विजयी विरुद्ध आदित्य गरडे. ४0+ : संतोष वाकरळकर विजयी विरुद्ध अमोल सरोदे.

दुहेरी : अनिल रसाम व प्रशांत कसबे विजय विजयी पुरुषोत्तम मार्कड अँड माचवे. ६0+ : गुरुचरण सिंग व नवीन सालियन विजयी विरुद्ध ओंकार जोग व दीपक कदम.

# महाराष्ट्र पुरुष, महिला उपांत्य फेरीत

**५८ वी राष्ट्रीय वरिष्ठ खो-खो स्पर्धा**

**काझीपेठच्या मैदानावर थरार**

◆ **काझीपेठ, १४ जानेवारी**

येथील रेल्वे मैदानावर सुरू असलेल्या ५८ व्या राष्ट्रीय वरिष्ठ खो-खो अजिंक्यपद स्पर्धेत महाराष्ट्राच्या पुरुष व महिला संघांनी जबरदस्त खेळ सादर करत उपांत्यपूर्व फेरी सहज पार केली आणि उपांत्य फेरीत दिमाखात प्रवेश केला. वेग, चपळाई, अचूक डावपेच आणि आक्रमक वृत्तीच्या जोरावर महाराष्ट्राने प्रतिस्पर्ध्यांना सावरण्याची संधीच दिली नाही. सामन्यागणिक वाढत गेलेला थरार आणि खेळाडूंची जिद्द पाहून प्रेक्षक अक्षरशः मंत्रमुग्ध झाले.



पुरुषांच्या उपांत्य सामन्यातील रोमहर्षक क्षण

उपांत्य फेरीत महिला गटात महाराष्ट्र विरुद्ध दिल्ली, तर एअरपोर्ट विरुद्ध ओडिशा यांच्यात लढत होणार आहे. पुरुष गटात महाराष्ट्र विरुद्ध कोल्हापूर आणि रेल्वे विरुद्ध ओडिशा हे सामने रंगणार आहे.

महिला गटाच्या उपांत्यपूर्व सामन्यात महाराष्ट्राने पश्चिम बंगालवर १ डाव १३ गुणांनी (२०७) मात करत उपांत्य फेरी गाठली. महाराष्ट्राकडून प्रियांका इंगळे (२.५० मि. संरक्षण व ४ गुण), संध्या सुरवसे (नाबाद ४.१० व १.४० मि. संरक्षण), अश्विनी शिंदे (३.४० मि. संरक्षण), सुहानी धोत्रे (४ गुण) यांनी प्रभावी कामगिरी नोंदवली. तर पराभूत पश्चिम बंगालकडून दीपिका चौधरी, टियासा हेल्डर व सुष्मिता दासने चांगला प्रतिकार केला.

अव्य उपांत्यपूर्व सामन्यात एअरपोर्ट अथॉरिटीने (विमान प्राधिकरण) गुजरातचा ३ मिनिटे व ९ गुण (२४१५) राखून पराभव केला. विमान प्राधिकरणकडून चित्रा बी., स्वाती पाटील, वैष्णवी पवार, स्नेहा लामकाणेने संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. गुजरातकडून उर्मिला, प्रिया चौधरी व उपासना चौधरीने चांगला खेळ केला.

पुरुष गटातील उपांत्यपूर्व फेरीत महाराष्ट्राने आंध्रप्रदेशवर (२३-१६) १ डाव ७ गुण राखून दणदणीत विजय मिळवला. महाराष्ट्राकडून प्रतिक वाईकर (२ व १.२० मि. संरक्षण), सुयश गरगटे (२ मि. संरक्षण), शुभम थोरात (१.५० मि. संरक्षण व ४ गुण), निहार दुबळे (८ गुण) व अनिकेत चेंदवणेकर (१.५० मि. संरक्षण) दमदार कामगिरी केली.

दुसऱ्या पुरुष उपांत्यपूर्व सामन्यात कोल्हापूरने दिल्लीचा (३६२४) १२ गुणांनी पराभव केला. कोल्हापूरकडून विजय हजारे, अमित पाटील, देवेंद्र दिलीप, मजहर जमादार व अर्णव पाटणकरने मैदान गाजवले.

पुरुष गटात रेल्वेने कर्नाटकचा (२३१५) १ डाव ८ गुणांनी पराभव केला. रेल्वेकडून आदित्य गणपुले, महेश शिंदे, अभिनंदन पाटील, अरुण गुणकी व अक्षय गणपुलेने निर्णायक कामगिरी केली. चौथ्या सामन्यात ओडिसाने केरळचा ३ मिनिटे व ६ गुण (२९-२३) राखून पराभव करत उपांत्य फेरी गाठली. ◀(वृत्तसंस्था)

# शालेय राष्ट्रीय कबड्डी स्पर्धापूर्व प्रशिक्षण शिबीरास सुरुवात

**सोलापूरची संस्कृती माने महाराष्ट्र संघात, संतोष जाधव संघ व्यवस्थापक**


संस्कृती माने


संतोष जाधव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

महाराष्ट्राच्या १४ वर्षांखालील मुलींच्या शालेय कबड्डी स्पर्धापूर्व प्रशिक्षण शिबीरास पार्क स्टेडियम वर सुरवात झाली.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांचे वतीने १७ जानेवारीपर्यंत हे शिबिर ठाण्याच्या तालुका क्रीडा अधिकारी सायली जाधव यांच्या मार्गदर्शनखाली सुरू झाले. या संघात येथील संस्कृती दिपक माने हिची निवड झाली.

राज्य शालेय कबडडी स्पर्धा शिरोली (कोल्हापूर) येथे संपन्न झाल्या. यातून महाराष्ट्राचे संघ निवडण्यात आले. हे संघ गुडीवाडा, आंध्रप्रदेश येथे १९ ते २३ जानेवारी दरम्यान होणाऱ्या ६९व्या शालेय राष्ट्रीय स्पर्धेत भाग घेतील. या संघाच्या संघव्यवस्थापकपदी येथील जागृती प्रशालेचे क्रीडा शिक्षक संतोष जाधव यांची निवड झाली आहे. त्यांनी रुक्माई स्पोर्टस् क्लबच्या माध्यमातून खेळाडू घडविले आहेत.

त्यांच्या या निवडीबद्दल मागास समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष सुभाष चव्हाण, उपाध्यक्ष विवेक चव्हाण, सचिव किरण चव्हाण प्राचार्य विजयरत्न चव्हाण, सोलापूर जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष अनिल जाधव, सचिव मदन गायकवाड व तसेच सोलापूर जिल्हा क्रीडा कार्यालयाचे क्रीडा अधिकारी हारनाळे व क्रीडा मार्गदर्शक सत्येन जाधव यांनी अभिनंदन केले.

# सोलापूर विद्यापीठाचा विनीत दिनकर देशात पाचवा

## ▶▶खेलो इंडिया स्पर्धेसाठी पात्र : सुवर्णपासून १०० मीटर शर्यतीत विनित ०.२२ सेकंदाने मागे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

अखिल भारतीय आंतर विद्यापीठ ॲथलेटिक्स स्पर्धेमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या विनीत दिनकर याने १०० मीटर धावण्याच्या शर्यतीत पाचवे स्थान (१०.६६ से.) प्राप्त केले. प्रथम पाचमध्ये महाराष्ट्रातील विद्यापीठामध्ये तो एकमेव खेळाडू आहे. यात तमिळनाडूच्या भराटियार विद्यापीठाच्या सॅम वसंतने १०.४४ सेकंदात ही शर्यत जिंकत वेगवान धावपटूचा मान मिळविला.

सोलापूरचा विनित सुवर्णपदकापासून 0.२२ सेकंदाने मागे आहे. या कामगिरीवर विनित खेलो इंडिया स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. खेलो इंडियासाठी पात्र होणारा हा दुसरा विद्यार्थी आहे. संगमेश्वर महाविद्यालयाचा विनित नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर विराट स्पोर्टस् क्लबमध्ये सुर्याजी लिंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतो. अल्वाज एज्युकेशन शिक्षण संस्था मोंडबिंद्री कर्नाटक येथे सुरू असलेल्या स्पर्धेत सलामीच्या दिवशी दहा हजार मीटर धावण्याच्या शर्यतीत दाजी हुबळे याने आठवे स्थान प्राप्त करीत त्याने खेलो इंडिया स्पर्धेसाठी स्थान निश्चित केले आहे. डॉ. अशोक पाटील हे त्यांचे प्रशिक्षक आहेत.






खेलो इंडियासाठी पात्र ठरलेल्या विनीत दिनकर याच्यासमवेत प्रशिक्षक अशोक पाटील.

## महत्वाचे...



### जनसमर्थ पोर्टलद्वारे शेतकरी बांधवांना तात्काळ कर्ज वाटप

**करकंब, दि.१४ जानेवारी-**

जनसमर्थ कर्ज म्हणजे भारत सरकारच्या विविध क्रेडिट लिंक सरकारी योजनांसाठी उदाहरणार्थ शेती,शिक्षण,गृहनिर्माण, व्यवसाय यासाठी हे एक राष्ट्रीय डिजिटल पोर्टल आहे.जिथे नागरिक ऑनलाईन अर्ज करू शकतात,पात्रता तपासू शकतात व कर्ज मंजुरीची प्रक्रिया ही सुलभ करू शकतात.त्यामुळे कर्जाची उपलब्धता आणि प्रक्रिया पारदर्शक बनते.या पोर्टलमुळे अर्जदारांना मुद्राकर्ज,प्रधानमंत्री सूर्यघर योजना व इतर अनेक सरकारी योजनांचा एकाच ठिकाणी लाभ घेता येतो. कुमार आशीर्वाद जिल्हाधिकारी सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली चालू करण्यात आलेल्या या जनसमर्थ योजनेद्वारे रविंद्र बाळासाहेब माने सांगवी,विजय निवृत्ती लोंढे करकंब ता.पंढरपूर येथील शेतकरी बांधवांनी ऑनलाईन अर्ज आपले सरकार सेवा केंद्र करकंबचे चालक समाधान सुरेश गुंड यांच्या केंद्रामधून केला होता.त्यांचे कर्जवाटप रविंद्र धुमाळ शाखाधिकारी भारतीय स्टेट बँक करकंब यांच्या हस्ते रविंद्र बाळासाहेब माने,विजय निवृत्ती लोंढे यांना करण्यात आले.जनसमर्थ योजनेद्वारे कर्ज मंजूर व्हावे यासाठी भारतीय स्टेट बँक करकंब व आपले सरकार सेवा केंद्र करकंबचे चालक समाधान गुंड यांनी सहकार्य केले.त्यांनी केलेल्या सहकार्य व मार्गदर्शनाबद्दल शेतकरी रविंद्र बाळासाहेब माने,विजय निवृत्ती लोंढे यांनी समाधान व्यक्त करून त्यांचे आभार मानले.



### करमाळा अर्बन बँक व भाजपातर्फे पत्रकार दिन व मकरसंक्रांत साजरी

**करमाळा,दि.१४ जानेवारी-**

मराठी पत्रकार दिन व मकरसंक्रांतीनिमित्त तिळगुळ वाटप तसेच करमाळा नगरपरिषदेचे स्वीकृत नगरसेवक व उपनगराध्यक्ष यांचा सत्कार सन्मान सोहळा करमाळा अर्बन बँक व भाजपा करमाळा यांचे संयुक्त विद्यमाने साजरा करण्यात आला. यावेळी भाजपा नेते तथा करमाळा अर्बन बँकेचे चेअरमन कन्हैयालाल देवी, व्हा. चेअरमन गोरख जाधव, संचालक कलीम काझी, चंद्रकांत चुंबळकर, जितेश कटारिया, भाजपा माजी जिल्हा उपाध्यक्ष किरण बोकन, भाजपा जिल्हाध्यक्ष प्रज्ञासेल तथा वंदेमातरम शक्तीसेनेचे अध्यक्ष सुहास घोलप, कार्यकारणी सदस्य बाळासो कुंभार, माजी शहराध्यक्ष संजय घोरपडे, अर्बन बँकेचे व्यवस्थापक प्रकाश क्षीरसागर आदी उपस्थित होते. यावेळी सर्व पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. करमाळा नगरपरिषदेचे स्वीकृत नगरसेवक सिद्धेश लावंड व उपनगराध्यक्ष अतुल फंड यांचा अध्यक्ष व संचालकांच्या वतीने सत्कार करण्यात आला. मकरसंक्रांतीनिमित्त तिळगुळ वाटप करण्यात आले. पत्रकार नासिर कबीर, भाजपाचे जिल्हाध्यक्ष घोलप, पत्रकार अशोक मुरूमकर, प्रफुल्ल दामोदर आदींनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास सर्व पत्रकार, भाजपाचे पदाधिकारी, बँकेचे अधिकारी व कर्मचारी तसेच नागरिक उपस्थित होते. प्रकाश क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. सुहास घोलप यांनी आभार मानले.

# बार्शी तालुक्यात 'लाडकी बहीण' योजनेचा खोळंबा

## मकर संक्रांतीच्या सणात महिलांमध्ये तीव्र संताप

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग,दि.१४ जानेवारी-**

राज्य सरकारची महत्त्वाकांक्षी मानली जाणारी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना सध्या बार्शी तालुक्यात वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. तालुक्यातील अनेक पात्र महिलांनी केवायसी आणि

> एकीकडे अधिकारी सोलापूरला जाण्याचा सल्ला देत आहेत, तर दुसरीकडे सामान्य ग्रामीण महिलेला एका चौकशीसाठी जिल्हा पातळीवर जाणे आर्थिकदृष्ट्या आणि वेळेअभावी परवडणारे नाही. त्यामुळे तालुक्याच्या ठिकाणीच या त्रुटी का दुरुस्त केल्या जात नाहीत, असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.



सर्व तांत्रिक प्रक्रिया वेळेत पूर्ण करूनही, नोव्हेंबर, डिसेंबर आणि आता जानेवारी महिन्याचा हप्ता त्यांच्या खात्यात जमा झालेला नाही. मकर संक्रांतीसारख्या मोठ्या सणाच्या काळात हक्काचे पैसे न मिळाल्याने ग्रामीण भागातील महिलांमध्ये सरकार विरोधात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

**तांत्रिक त्रुटींचा फटका की प्रशासकीय उदासीनता?**

बार्शी शहर, वैराग भाग आणि ग्रामीण भागातील हजारो महिलांनी योजनेसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे आणि केवायसीची पूर्तता केली आहे. असे असूनही, काही महिलांच्या खात्यात पैसे जमा झाले आहेत, तर शेकडो महिला अद्याप प्रतीक्षेत आहेत. यामुळे आम्ही सरकारसाठी लाडक्या बहिणी आहोत की नाही? असा संतप्त सवाल महिला विचारत आहेत.

> आम्ही वेळेवर फॉर्म भरले, अंगठ्याचे ठसे दिले, तरीही पैसे का मिळत नाहीत? सरकार केवळ घोषणा करतंय की प्रत्यक्ष मदत देणार आहे?
>
> **- एक त्रस्त लाभार्थी महिला, बार्शी तालुका.**

**केवायसी पूर्ण असूनही लाभ नाही**

अनेक महिलांनी विहित मुदतीत केवायसी अपडेट केली, तरीही त्यांच्या खात्यात १५०० रुपयांचा हप्ता जमा झालेला नाही. मकर संक्रांतीच्या काळात पैसे मिळतील अशी आशा महिलांना होती, मात्र पदरी निराशा पडल्याने सणाचा आनंद विरला आहे.

> ज्या महिलांनी केवायसी करताना माहिती भरण्यात चुका केल्या किंवा काही तांत्रिक त्रुटी (Options mismatch) राहिल्या, त्यांचे पेमेंट रखडले असू शकते. अशा महिलांनी माहिती घेण्यासाठी सोलापूर येथील जिल्हा कार्यालयात जाऊन चौकशी करावी.
>
> **-सुरेश काटकर, विस्तार अधिकारी,बार्शी.**

**निवडणुकीत फटका बसण्याची शक्यता**

राज्यात आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांचे वारे वाहत आहेत. अशा परिस्थितीत 'लाडकी बहीण' योजनेचा लाभ न मिळणे हे सत्ताधारी पक्षासाठी नुकसानकारक ठरू शकते. ग्रामीण भागातील महिला वर्गामध्ये निर्माण झालेला हा रोष थेट मतपेटीतून व्यक्त होण्याची भीती राजकीय विश्लेषकांकडून व्यक्त केली जात आहे.

# मंद्रूप मधील झाडे पाण्याअभावी वाळली

## ग्रामपंचायतच्या कारभारावर संताप

**तभा वृत्तसेवा,**
**द. सोलापूर, दि. १४ जानेवारी**

मंद्रूप येथील माझी वसुंधरा योजनेच्या पुरस्कार रक्कमेतून लाखो रुपये खर्च करून झाडे लावण्यात आली. ग्रामपंचायतीकडून पर्यावरण संरक्षणासाठी वृक्ष लागवड करण्यात आली. मंद्रूपमधून इतर गावांना जाणाऱ्या रस्त्यांवर झाडे लावून व संरक्षक कवच करून लाखो रुपये खर्ची टाकण्यात आले. दोन महिन्यापूर्वी लावण्यात



आलेली झाडे सध्या ग्रामपंचायतकडून पाणी न घातले गेल्यामुळे झाडे वाळून चालली आहेत. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या कारभारावर पर्यावरणप्रेमींमधून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

दोन महिन्यापूर्वी मंद्रूप ग्रामपंचायतकडून मंद्रूप बस स्थानक, नांदणी रोड, भंडारकवठे रोड , हद्दवाढ भागातील इतर रस्ते, स्मशानभूमी, शाळा, अंगणवाडी व दवाखाना या ठिकाणी मोठ्या प्रमाणात देशी जातीचे वृक्ष लावण्यात आले. पावसाळ्यात झाडे लावल्यामुळे झाडे स्थिर झाले. मात्र या झाडांना एक महिन्यापासून ग्रामपंचायतकडून पाणी न घातल्यामुळे ती झाडे सध्या वाळून चालली आहेत. त्यामुळे शासनाचा कोट्यावधी रुपयांची निधी वाया जात आहे. मंद्रूप ग्रामपंचायतने माझी वसुंधरा योजनेमधून पुरस्कार मिळाला असताना व त्याच पुरस्कार रक्कमेमधील झाडे पाण्याअभावी वाळून जात असल्यामुळे पर्यावरण प्रेमी मधून संताप व्यक्त करण्यात

## होमविधी



सोलापूर - येथील श्री सिद्धेश्वर महाराज यात्रेतील होमविधीचा कार्यक्रम बुधवारी रात्री संपन्न झाला.


**IDFC FIRST Bank Limited**

IDFC FIRST Bank

(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

**आर्थिक मालमत्तेचे सुरक्षाकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षा हितसंबंधांची अंमलबजावणी अधिनियम, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली आहेत. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांच्या कर्जांना त्यांच्या संबंधित मालमत्तांच्या गहाणाद्वारे सुरक्षित करण्यात आले आहे. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी व शर्तींचे पालन केले नाही आणि ते अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांची कर्जे एनपीए (अनुत्पादक मालमत्ता) म्हणून वर्गीकृत करण्यात आली आहेत. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यामध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि उक्त रकमेवर पुढील व्याज देखील लागू होईल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून करारानुसार दराने आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 142065575 | मालमत्तेवर कर्ज | 1. नवनाथ विजय दिक्षित<br>2. ऋतुजा विकास टकले | 06/12/2025 | INR 7,46,254.54/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मालमत्ता क्रमांक ३४१/१ असलेले, ७००.०० चौरस फूट क्षेत्रफळाचे निवासी घर, जे १५००.०० चौरस फूट क्षेत्रफळाच्या मोकळ्या जागेत (बखाल जागेत) बांधलेले आहे, गाव : महुद बुद्रुक, तालुका : सांगोला, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०७. पूर्व : लालासो मुलानी, पश्चिम : गणेश इरकर, उत्तर : सरकारी रुग्णालय, दक्षिण : रस्ता.

तुम्हाला याद्वारे सूचित करण्यात येते की, तुम्ही वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या तपशिलानुसार, संबंधित तारखांपासून करारानुसार निश्चित केलेल्या व्याजदरासह आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींसह, आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड**, जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली आहे आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) यांना या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत रक्कम अदा करावी. असे न केल्यास, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली आहे आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) यांना देय असलेली रक्कम वसूल करण्यासाठी, अधोस्वाक्षरीकर्ता, सरफेसी कायद्याच्या कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तांविरुद्ध कार्यवाही सुरू करण्यास बाध्य होईल. तसेच, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत, या सुरक्षित मालमत्तांची विक्री/भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरण करण्यास मनाई आहे.

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेडम्हणून ओळखले जाते)**

दिनांक : **15/01/2026**
स्थळ : **सोलापूर, महाराष्ट्र**



**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**सिग्नलिंग आणि दूरसंचार काम**

**निविदा सूचना क्रमांक SUR-N-T-2025-26-36. दिनांकः-13/01/2026**

डीआरएम (एस अँड टी) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी सक्षम, नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा आमंत्रित करत आहे: - कामाचे नाव आणि ठिकाण: सोलापूर विभागातील ताजसुलतानपूर आणि धाराशिव स्थानकांवर मालधक्क्यांच्या विकासाशी संबंधित एस अँड टी कामे. कामाची अंदाजित किंमत: 79,64,927.18/-. निविदा अर्जाची किंमत: शून्य. जमा करावयाची अनामत रक्कम: 1,59,300/-. काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 महिने. निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: 04/02/2026 रोजी 15.30 नंतर. तपशील ireps वेबसाइटवर उपलब्ध आहे. काही शुद्धिपत्रक/दुरुस्त्या असल्यास, त्या केवळ उपरोक्त ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केल्या जातील. केवळ ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/टपाल/ई-मेल, फॅक्स, प्रत्यक्ष सादर केलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोली लावणाऱ्यांना विनंती आहे की त्यांनी कंपनीच्या नावासह क्लास खखख डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र प्राप्त करावे आणि त्याची www.ireps.gov.in वर नोंदणी करावी. अनामत रकमेचे (EMD) पेमेंट नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे किंवा बँक गॅरंटीच्या स्वरूपात स्वीकारले जाईल आणि मूळ बँक गॅरंटी निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या नामित अधिकाऱ्याकडे निविदा सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी (म्हणजे निविदा सादर करण्याच्या शेवटच्या दिवसाव्यतिरिक्त) प्रत्यक्ष सादर करावी लागेल. अधिक तपशिलांसाठी कृपया भेट द्या: **www.ireps.gov.in.**

**डीआरएम-एस अँड टी शाखा, मध्य रेल्वे, सोलापूर**
Akar/Sur-5

रेल्वे मार्ग अनधिकृतपणे ओलांडणे हा शिक्षेस पात्र गुन्हा आहे



**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**सिग्नलिंग काम**

**निविदा सूचना क्रमांक SUR-N-T-2025-26-37. दिनांकः-13.01.2026**

डीआरएम (एस अँड टी) कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, खालील कामांसाठी सक्षम, नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा आमंत्रित करत आहे: कामाचे नाव आणि ठिकाण: मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात पुलांची पुनर्बांधणी आणि विस्तार, कमकुवत पूल आणि बोगदे बळकट करण्याच्या संबंधात सिग्नलिंगचे काम. कामाची अंदाजित किंमत: ₹ 1,27,23,245.45/-. निविदा अर्जाची किंमत: काहीही नाही. जमा करावयाची अनामत रक्कम: 2,13,600/-. काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 महिने. निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: 04.02.2026, 15.30 वाजेनंतर. तपशील ireps वेबसाइटवर उपलब्ध आहे. कोणतेही शुद्धिपत्रक/दुरुस्त्या असल्यास, त्या केवळ उपरोक्त ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केल्या जातील. केवळ ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. प्रत्यक्ष/टपाल/ई-मेल, फॅक्स, हाताने दिलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोली लावणाऱ्यांना विनंती आहे की त्यांनी कंपनीच्या नावासह क्लास खखख डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र प्राप्त करावे आणि त्याची www.ireps.gov.in वर नोंदणी करावी. अनामत रकमेचे (EMD) पेमेंट नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे किंवा बँक गॅरंटीच्या स्वरूपात स्वीकारले जाईल आणि मूळ बँक गॅरंटी निविदा सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी (म्हणजे निविदा सादर करण्याच्या शेवटच्या दिवसाव्यतिरिक्त) निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या नामित अधिकाऱ्याकडे समक्ष सादर करावी लागेल. अधिक तपशिलांसाठी कृपया भेट द्या: www.ireps.gov.in.

**डीआरएम-एस अँड टी शाखा सीआर, सोलापूर**
Akar/Sur-6

रेल्वे मार्ग अनधिकृतपणे ओलांडणे हा शिक्षेस पात्र गुन्हा आहे



**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**सिग्नलिंग काम**

**निविदा सूचना क्रमांक SUR-N-T-2025-26-38. दिनांकः-13.01.2026**

डीआरएम (एस अँड टी) कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, सक्षम, नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा आमंत्रित करत आहे: कामाचे नाव आणि ठिकाण: मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील CTR, TRR, TTR, TSR, TFTR, TBR आणि TWR संबंधित कामांच्या अनुषंगाने सिग्नलिंगची कामे. कामाची अंदाजित किंमत: 1,29,44,874.19/-. निविदा अर्जाची किंमत: शून्य. जमा करावयाची अनामत रक्कम: 2,14,700/-. काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 महिने. निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: 06/02/2026 रोजी 15.30 नंतर. तपशील ireps वेबसाइटवर उपलब्ध आहे. काही शुद्धिपत्रक/दुरुस्त्या असल्यास, त्या केवळ उपरोक्त ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केल्या जातील. केवळ ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/टपाल/ई-मेल, फॅक्स, प्रत्यक्ष सादर केलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोली लावणाऱ्यांना विनंती आहे की त्यांनी कंपनीच्या नावासह क्लास III डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र प्राप्त करावे आणि त्याची www.ireps.gov.in वर नोंदणी करावी. अनामत रकमेचे (EMD) पेमेंट नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे किंवा बँक गॅरंटीच्या स्वरूपात स्वीकारले जाईल आणि मूळ बँक गॅरंटी निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या नामित अधिकाऱ्याकडे निविदा सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी (म्हणजे निविदा सादर करण्याच्या शेवटच्या दिवसाव्यतिरिक्त) प्रत्यक्ष सादर करणे आवश्यक आहे. अधिक तपशिलांसाठी कृपया भेट द्या: www.ireps.gov.in.

**डीआरएम-एस अँड टी शाखा, मध्य रेल्वे, सोलापूर**
Akar/Sur-7

रेल्वे मार्ग अनधिकृतपणे ओलांडणे हा शिक्षेस पात्र गुन्हा आहे.


### श्रीराम पॉलिटेक्निकचे हिवाळी परीक्षेत यश

**माळशिरस,दि.११ जानेवारी-**

२०२५ डिप्लोमा परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. त्यामध्ये मेकॅनिकल विभागातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. यामध्ये प्रथम वर्ष - प्रथम माने यश ९२.६५%, द्वितीय - गमे अनुष्का ८१.०६%, तृतीय - चोरमले ज्ञानेश्वर ८०.८२%, द्वितीय वर्ष - प्रथम - भोसले आदित्य ७८.५६%, द्वितीय - लावंड यश ७७.८९ टक्के, तृतीय - कांबळे बजरंग ७७.५६ टक्के तृतीय वर्ष - प्रथम - शिंदे नागेश ८३.८८%, द्वितीय - ठोंबरे संस्कार ८०.४७%, तृतीय - तुपे प्रथमेश ७७.६५%.

याबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील, श्रीलेखा पाटील यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## निधन वृत्त...

### सुशीला काळे

**टेंभुर्णी, दि.१४ जानेवारी-**



वडोली (ता. माढा) येथील सुशीला नामदेव काळे (वय ८०) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. माजी सरपंच नामदेव काळे यांच्या पत्नी होत. वडोलीचे पोलीस पाटील व जिल्हा पोलीस पाटील संघटनेचे कार्याध्यक्ष धनाजी काळे यांच्या त्या मातोश्री होत.


**बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra**
**प्रधान कार्यालय/ Head Office**
**लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5**
**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापुर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

**नियम - ८ (१)**
**ताबा सूचना**

याद्वारे बँक ऑफ महाराष्ट्रचा अधिकृत अधिकारी, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, २००२ अंतर्गत, आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ३ सह वाचलेल्या कलम १३ च्या उप-कलम (१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि जामीनदारांना सदर सूचना मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत संपूर्ण देय रक्कम परत करण्याची मागणी करणारी मागणी सूचना दिनांक ०३/११/२०२५ रोजी जारी केली होती.

कर्जदाराने रक्कम परत करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, याद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचित करण्यात येते की, मी, सदर कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (४) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट नियम, २००२ च्या नियम ८ अंतर्गत मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, दिनांक ०८/०१/२०२६ रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला या मालमत्तांशी कोणताही व्यवहार न करण्याची ताकीद देण्यात येत आहे आणि मालमत्तांशी केलेला कोणताही व्यवहार बँक ऑफ महाराष्ट्रच्या वर नमूद केलेल्या रकमेच्या भाराच्या अधीन असेल.

सुरक्षित मालमत्ता सोडवण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात, कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे वेधले जाते.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा- उजनी कॉलनी**<br>**कर्जदार -**<br>**सौ.प्रियांका नितीन टिंगरे**<br>पत्ता : फ्लॅट नं. ३०३ राघवेंद्र रेसिडेन्सी तिसरा मजला, प्लॉट नं. १४ एसबी, प्लॉट नं. ४०, रविवर पेठ, गांधी नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर- ४१३००६<br>**सह-कर्जदार:**<br>**श्री. नितीन सिद्धेश्वर टिंगरे**<br>पत्ता : फ्लॅट नं. ३०३, राघवेंद्र रेसिडेन्सी तिसरा मजला, प्लॉट नं. १४ एसबी, प्लॉट नं. ४०, रविवर पेठ, गांधी नगर, अक्कलकोट रोड सोलापूर- ४१३००६ | श्रीमती प्रियांका नितीन टिंगारे आणि श्री. नितीन सिध्देश्वर टिंगारे यांच्या नावावरील मालमत्तेचे गहाणखत.<br>सोलापूर जिल्ह्यातील रविवार पेठ येथे असलेल्या खालील सर्व जमिनीच्या तुकड्यांचे नोंदणीकृत गहाणखत:<br>**अ -** रविवार पेठ, सोलापूर महानगरपालिका हद्दीत, सोलापूर येथे स्थित, टी.पी. क्रमांक १, सीटीएस क्रमांक ९६९८, फायनल प्लॉट क्रमांक १४, सब-प्लॉट क्रमांक ४०, 'राघवेंद्र रीजन्सी अपार्टमेंट' मधील तिसऱ्या मजल्यावरील निवासी फ्लॅट क्रमांक ३०३, ज्याचे कार्पेट क्षेत्रफळ ४५.१३३ चौ.मी. आहे.<br>**चतु:सीमा खालीलप्रमाणे:**<br>पूर्वेस - मोकळी जागा, दक्षिणेस - फ्लॅट क्रमांक ३०४, पश्चिमेस - प्रवेशद्वार लॉबी, उत्तरेस - मोकळी जागा<br>**बी -** दुकान क्रमांक २, तळमजला, राघवेंद्र रीजन्सी अपार्टमेंट, टी. पी. क्रमांक १, सीटीएस क्रमांक ९६९८, अंतिम भूखंड क्रमांक १४, उप-भूखंड क्रमांक ४०, चटई क्षेत्र १७.०८७ चौरस मीटर, गांधी नगर, रविवार पेठ, सोलापूर महानगरपालिका हद्दीत, सोलापूर येथे स्थित, ज्याच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत:<br>**चतु:सीमा खालीलप्रमाणे: -**<br>पूर्व - प्रवेशद्वार, दक्षिण - दुकान क्रमांक ०३, पश्चिम - जिना, उत्तर - दुकान क्रमांक ०२ ए<br>**सी -** दुकान क्रमांक ३, तळमजला, राघवेंद्र रीजन्सी अपार्टमेंट, टी. पी. क्रमांक १, सीटीएस क्रमांक ९६९८, अंतिम भूखंड क्रमांक १४, उप-भूखंड क्रमांक ४०, चटई क्षेत्र २४.०३८ चौ.मी., रविवार पेठ, सोलापूर महानगरपालिका हद्दीत, सोलापूर येथे स्थित, ज्याच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत:<br>**चतु:सीमा खालीलप्रमाणे: -**<br>पूर्व - प्रवेशद्वार, दक्षिण - मोकळी जागा,<br>पश्चिम: - पार्किंग, उत्तर: - दुकान क्रमांक ०२ बी<br>CERSI आयडी - मालमत्ता आयडी: २०००७८७०१९६२ | **मागणी सूचना:**<br>**दिनांक: ०३/११/२०२५.**<br>**खाते शिल्लक:** रु. २२,०५,९१४.०० + लागू न केलेले व्याज: रु. ९०२३९.००/- एकूण रु. २२,९६,१४३.००/-<br>**खाते शिल्लक:** रु. १९,३५,३२३.०० + लागू न केलेले व्याज: रु. १,१६,६५३.००/- एकूण रु. २०,५१,९७६.००/-<br>**एकूण:** रु. ४३,४८,११९.००/- (रुपये त्रेचाळीस लाख अठ्ठेचाळीस हजार एकशे एकोणीस फक्त)<br>**सांकेतिक ताबा दिनांक :**<br>०८/०१/२०२६ |

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - 08/01/2026**

**सही/-**
**मुख्य व्यवस्थापक आणि प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.**



**जाहिर प्रकटन**

**'क' प्रवर्गातील सहकारी संस्थांच्या संचालक मंडळ निवडणुकीचा कार्यक्रम**

क प्रवर्गातील खालील संस्थांचा सन २०२५ ते २०३०-२०३१ या कालावधीच्या संचालक मंडळ निवडणुकीसाठीचा निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

**संचालक मंडळ निवडणूक कार्यक्रमातील महत्त्वाचे टप्पे**

| अ. क्र. | संस्थेचे नाव | निवडणूक निर्णय अधिकारी | नामनिर्देशन पत्रांची विक्री व स्विकृती | नामनिर्देशन पत्राची छानणी | वैध नामनिर्देशन पत्राची प्रसिध्दीची तारीख | उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख | आवश्यक असल्यास मतदान |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या., सांगोला | ए.एस. पुजारी, सहकारी अधिकारी श्रेणी-२ | दि. १५/०१/२०२६ ते दि. २१/०१/२०२६ स. ११.०० ते दु. ३.०० वा. | दि. २२/०१/२०२६ सकाळी ११.०० ते दु. ३.०० वा. | दि. २३/०१/२०२६ सकाळी ११.०० | दि. २३/०१/२०२६ ते दि. ०६/०१/२०२६ स. ११.०० ते दु. ३.०० वा. | दि. १४/०२/२०२६ रोजी स.८.०० ते दु. ४.०० |
| २ | विजयालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सांगोला | ए.डी. गोसावी, सहाय्यक सहकारी अधिकारी | | | | | |
| ३ | श्री संत तुकाराम ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., हटकर मंगेवाडी | ए.एस. पुजारी, सहकारी अधिकारी श्रेणी-२ | | | | | |
| ४ | शिवबाराजे ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., वाटंबरे | ए.डी. गोसावी, सहाय्यक सहकारी अधिकारी | | | | | |
| ५ | रुद्रपशुपतीनाथ महिला सहकारी पतसंस्था मर्या., कोळा | ए.डी. गोसावी, सहाय्यक सहकारी अधिकारी | | | | | दि. १५/०२/२०२६ रोजी स.८.०० ते दु. ४.०० |
| ६ | जय महाराष्ट्र ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., कमलापूर | ए.एस. पुजारी, सहकारी अधिकारी श्रेणी-२ | | | | | |

**टिप :- सदर कार्यक्रम सुट्ट्यांचे दिवस वगळून आहे.**

संस्थांचा सविस्तर निवडणूक कार्यक्रम त्या संस्थेच्या नोटीस बोर्डावर, संबंधित संस्थेचे निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयातील नोटीस बोर्डावर व तालुका सहकारी अधिकारी, तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सांगोला पत्ता :- क्षत्रिय माळी वि.का.से. इमारत १ ला मजला, कचेरी रोड, सांगोला, ता. सांगोला, जि. सोलापूर येथील नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे. तरी संबंधित संस्थांचे सभासदांनी सभासद यादी सविस्तर निवडणूक कार्यक्रम व अधिक माहितीसाठी या कार्यालयाशी संपर्क साधावा.

**स्थळ - सांगोला**
**दिनांक - १५/०१/२०२६**

शिक्का

**सही/-**
**(डॉ. वैशाली साळवे)**
**तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालुका सांगोला, जिल्हा सोलापूर**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/






सोलापूर : सालाबादप्रमाणे यंदाही श्री सिध्देश्वर यात्रेतील मानाच्या नागफणी सजावट नंदीध्वजाने भाविकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.
छायाचित्र : केवल तिवारी







छायाचित्र : नागेश दंतकाळे

# करमुटगी धार्मिक विधीने उतरवली सिद्धरामेश्वरांची हळद

## • अक्षता सोहळ्यानंतर योगदंडासह नंदीध्वजांना सिद्धेश्वर तलावातील पाण्यात घातले स्नान •

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ जानेवारी**

ग्रामदैवत श्रीसिद्धेश्वर यात्रेतील अक्षता सोहळ्यानंतर करमुटगी हा धार्मिक विधी पारंपारिक पद्धतीने श्रीसिध्देश्वर मंदिरात संपन्न झाला.

ग्रामदैवतशिवयोगी सिद्धरामेश्वर महाराजांच्या यात्रेच्या अक्षता सोहळ्याच्या नंतर हळद उतरविण्याचा धार्मिक विधी संपन्न करण्यात आला. विविध धार्मिक विधीपैकी एक असणारा करमुटगी हा धार्मिक विधी पारंपारिक पद्धतीने विधिवत पूजनेने बुधवारी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास संपन्न झाला. श्री सिध्देश्वर महाराजांच्या योगदंड आणि मानाच्या सात नंदीध्वजांना सिध्देश्वर तलावात स्नान घालून हळद उतरवली. त्यानंतर यात्रा प्रमुख हिरेहब्बू बंधूंनी मंदिरातील अमृत शिवलिंगाची मानकरी देशमुख परिवार यांच्या उपस्थितीत विधिवत पूजा करून मानाचे विडे दिले. तदनंतर आरती करण्यात आली.

दरम्यान याबाबत मानकरी सुदेश देशमुख यांनी या धार्मिक विधींचे महत्व विषद केले.यावेळी मानकरी देशमुख परिवारातील सर्व सदस्यांची उपस्थिती होती. दरम्यान, नववर्षातील पहिला सण असणाऱ्या मकर संक्रांतीनिमित्त ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर मंदिरात श्रींचे दर्शन घेण्यासाठी अबालवृद्ध भाविकांची पहाटेपासून मांदियाळी दिसून आली. संमती कट्ट्या जवळील शिवलिंगाचे दर्शन घेऊन भाविकांनी तिळगुळ अर्पण केले. यावेळी मंदिर परिसरात भाविकांची एकच गर्दी दिसून आली. त्याच पद्धतीने श्रींच्या शिवयोग समाधीस देखील विविध प्रकारचे धान्य बोर पेरू गाजर फळ गूळ बाजरी आणि ज्वारीचे कणीस अशा विविध खाद्यपदार्थांचा अन्नधान्यांचा भोग चढवण्यात आला होता. त्यामुळे सर्वत्र तेजोमय वातावरण पाहावयास मिळाले.

# सोन्या मारुती गणरायांना बाराबंदी फेटा; धोतर पोशाख

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ जानेवारी-**

सोलापूर शहरात ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराजांच्या यात्रेचा उत्सव सर्वत्र सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर शहरात आनंदाचे आणि भक्तीचे वातावरण आहे.

यात्रेच्या पार्श्वभूमीवर सोन्या मारुती चौकातील मानाचा सोन्या मारुती गणेशोत्सव मंडळांने सोन्या मारुती गणरायांना सिद्धरामेश्वर यात्रेत नंदीध्वजधारक परिधान करीत असलेले फेटा बाराबंदी धोतर मानाचा कागदी हार घालण्यात आल्याने सोन्या मारुती गणरायांचे रुप विलोभनीय दिसत आहे. दरम्यान, या मार्गावरून अक्षता सोहळा तसेच होम प्रदीपन आणि दारूकाम या धार्मिक विधीसाठी नंदीध्वजांची मिरवणूक मार्गस्थ होत असते. त्यामुळे भाविकांना सोन्या मारुतीचे आकर्षक विलोभनीय दर्शन पहावयास मिळाले आहे.



# सिध्दरामेश्वरांच्या जीवनावर आधारित 'ड्रोन शो' बाबत भक्तांची उत्सुकता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ जानेवारी-**

ग्रामदैवत शिवयोगी श्री सिध्दरामेश्वर यांच्या यात्रेनिमित्त गुरूवार,१५ रोजी होम मैदानावर प्रथमच होत असलेला लेझर ड्रोन शो पाहण्यासाठी भक्तांची उत्सुकता वाढली आहे. गुरुवारी रात्री ८ ते १० या वेळेत होणाऱ्या या लेझर ड्रोन शोमध्ये, सुमारे ३०० ड्रोनच्या मदतीने शिवयोगी श्री सिध्दरामेश्वर यांच्या चरित्रावर आधारीत भव्य देखावे आकाशाच्या पडद्यावर सादर करण्यात येणार आहेत.

राजधानी दिल्लीजवळील गुरूग्राम येथील एअरबोटिक्स टेक्नॉलॉजी ही कंपनी ड्रोन लेझर शो सादर करणार आहे.गेल्या पाच वर्षापासून श्री सिध्देश्वर देवस्थानच्यावतीने शोभेच्या दारूकामाच्या दिवशी लेझर शो, टुडी आणि थ्रीडी लेझर शो सारखे नव नवे उपक्रम राबविले जात आहेत. या उपक्रमांना सिध्दरामेश्वर भक्तांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे.



आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आपल्या आराध्य दैवताचे चरित्र प्रत्यक्ष पाहणे हा अफलातून अनुभव असल्याची भक्तांची भावना आहे. यंदा होणाऱ्या ड्रोनशोमध्ये सिध्दरामेश्वरांचे चरित्र, त्यांनी केलेले लोककल्याणाचे कार्य, त्यांची वचने आणि सोन्नलगी-सोलापूरला भू कैलास बनवल्याची कथा सांगण्यात आली आहे. मल्लिकार्जुन आणि बालक सिध्दरामेश्वर यांच्या श्रीशैल पर्वतावरील भेटीचा 'कमरी कोळ्ळ' नावाने प्रसिध्द असलेल्या प्रसंगाच्या थ्रीडी शोला मागील वर्षी सिध्दरामेश्वर भक्तांचा मोठा प्रतिसाद लाभला होता.

या पार्श्वभूमिवर उद्या होणाऱ्या ड्रोन लेझर शोबद्दल भक्तांच्या मनातील उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.



# माजी जि.प. अध्यक्ष शिवानंद पाटील यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

**भाजपा सोडल्याने अक्कलकोटच्या राजकारणात खळबळ**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १४ जानेवारी-**

जिल्हा परिषद निवडणूक जाहीर होताच जिल्ह्यातील राजकारणाला वेग आला असून, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष शिवानंद पाटील यांनी भाजपला रामराम ठोकत राष्ट्रवादी अजित पवार गट मध्ये प्रवेश केल्याने अक्कलकोटच्या राजकारणात खळबळ उडाली आहे.

मकर संक्रांतीच्या शुभमुहूर्तावर अक्कलकोटचे दिवंगत माजी आमदार कै. सिद्धारामप्पा पाटील यांचे चिरंजीव, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष व सहकार क्षेत्रातील प्रभावी नेतृत्व असलेले शिवानंद पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अधिकृत पक्षप्रवेश केला. त्यांच्या सोबत अक्कलकोट पंचायत समितीचे माजी सभापती संजय पाटील, तसेच दिलीप पाटील आणि इतर सहकाऱ्यांनीही राष्ट्रवादीत प्रवेश केला. शिवानंद पाटील हे जिल्हा परिषदेत प्रभावी नेतृत्व म्हणून ओळखले जातात. भाजप सोडण्यामागचे अधिकृत कारण जाहीर झाले नसले, तरी पक्षांतर्गत मतभेद आणि स्थानिक नेतृत्वाशी झालेल्या वैचारिक संघर्षामुळे त्यांनी हा निर्णय घेतल्याची चर्चा आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा सोलापूर दौरा आचार संहितेमुळे रद्द झाल्याने पक्षप्रवेशाचा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला होता पण आज जिल्हा अध्यक्ष उमेश पाटील, राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते बळीराम काका साठे यांच्या उपस्थितीत प्रवेश झाला.या पक्षप्रवेशामुळे सोलापूर जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या संघटनात्मक ताकदीत लक्षणीय वाढ झाल्याचे मानले जात असून, आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय समीकरणांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# निवडणूक कर्तव्य बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांना मतदानासाठी एक तासाची विशेष सवलत

**सोलापूर, दि.१४ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अंतर्गत गुरुवारी मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी महानगरपालिकेच्या विविध विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांची निवडणूक कामासाठी नियुक्ती करण्यात आली आहे.निवडणूक कर्तव्य बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांना मतदानासाठी एक तासाची विशेष सवलत

गुरुवार दि. १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत शहरातील सर्व मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. निवडणूक कर्तव्य बजावत असताना कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्याचा मतदानाचा हक्क वंचित राहू नये, तसेच लोकशाही प्रक्रियेत त्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित व्हावा, या उद्देशाने आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे.

या निर्णयानुसार, निवडणूक कामासाठी नियुक्त सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान करण्यासाठी कर्तव्य कालावधीत एक तासाची विशेष सवलत देण्यात येणार आहे.

# समाज माध्यमावर पोलिसांची बदनामी करणारा व्हिडिओ पोस्ट केल्यामुळे दोघांविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. १४ जानेवारी-**

मिळालेली माहिती खरी असल्याची खातरजमा न करता दिशाभूल करणारी चुकीची माहिती सांगून, समाज माध्यमावर बनावटीकरण केलेला ऑडिओ, व्हिडीओ व्हायरल करून मोहोळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे व मोहोळ पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी यांच्या विरुद्ध असभ्य, अश्लील, अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून जाणीवपूर्वक प्रसारमाध्यमावर पोलिसांची बदनामी केल्याप्रकरणी संग्राम फाटे व हर्षु ठाकूर यांच्यावर दि. १३ रोजी रात्री उशीरा गुन्हा दाखल करण्यात आला.

दि. १० जानेवारी रोजी संग्राम फाटे रा. शेटफळ ता. मोहोळ, व हर्षु ठाकूर यांनी त्यांना मिळालेली माहिती खरी असल्याची खातरजमा न करता दुरुपयोग होऊन पो.नि. शेडगे यांच्याकडून कारवाई करण्यात यावी अशी दिशाभूल करणारी चुकीची माहिती सांगून, समाज माध्यमावर बनावटीकरण केलेला ऑडिओ, व्हिडीओ व्हायरल करून पो.नि शेडगे व मोहोळ पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी यांच्या विरुद्ध असभ्य,अश्लील, अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून जाणीवपूर्वक प्रसार माध्यमावर पोलिसांची बदनामी करण्याच्या उद्देशाने, तसेच पोलिसांना त्यांचे नियमित कर्तव्य बजावणी पासून परावृत्त करण्यासाठी धमकावून पोलीस दलाच्या लौकिकास बाधा आणून अप्रतिची भावना निर्माण केली आहे. तसेच जनमानसात पोलिसांची प्रतिमा मलीन करण्याचे उद्देशाने सदरचा बनावटीकरण केलेला ऑडिओ व व्हिडिओ दि. १० जानेवारी ते फिर्याद दाखल होईपर्यंतच्या वेळेत प्रसारमाध्यम ावर जाणीवपूर्वक व्हायरल केला आहे म्हणून संग्राम फाटे व हर्षु ठाकूर यांच्या विरुद्ध पो. नि. हेमंत शेडगे यांनी मोहोळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून अधिक तपास सहा. पो. निरीक्षक अंजना फाळके करित आहेत.



# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## डॉ. प्रतापसिंह पाटील यांना जलाभिषेकाचा मान

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ जानेवारी -**

छत्रपती संभाजी महाराजांच्या गौरवशाली परंपरेचे प्रतीक असलेल्या श्री शंभूछत्रपती राज्याभिषेक सोहळा २०२६ निमित्त राजधानी रायगड येथे दि.१६ जानेवारी रोजी होणाऱ्या ऐतिहासिक कार्यक्रमात जलाभिषेकाचा मान मिळाल्याबद्दल धाराशिव राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्रजी पवार गट) चे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांचे सर्वस्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.



शिवशंभूंच्या विचारधारेचा व संस्कृतीचा सन्मान राखत दिला जाणारा हा मान अत्यंत गौरवपूर्ण असून, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील डॉ. पाटील यांच्या योगदानाची ही पावती मानली जात आहे. हा सन्मान केवळ एका व्यक्तीपुरता मर्यादित नसून, शिवपरंपरेचा वारसा जपणाऱ्या विचारधारेचा गौरव असल्याची भावना व्यक्त होत आहे. या ऐतिहासिक सोहळ्यानिमित्त डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्यावर सर्वत्र शुभेच्छांचा वर्षाव होत असून, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### कानेगाव शाळेत पालक मेळावा व देणगीदारांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१४ जानेवारी -**

दि.१२ जानेवारी रोजी लोहारा तालुक्यातील कानेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत राजमाता जिजाऊ व युगपुरुष स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त पालक मेळावा व देणगीदार ग्रामस्थांचा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला.शाळेला गावचा आधार आणि गावाला शाळेचा अभिमान या भावनेतून ग्रामस्थांनी शाळेच्या भौतिक सुविधांसाठी देणगी दिली असून विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी विस्ताराधिकारी विश्वजीत चंदनशिवे, विशेष शिक्षक रविशंकर आगळे, सरपंच नामदेव लोभे, धाराशिव लोकसभा अध्यक्ष तथा युवा नेते आनंद पाटील, विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन अमोल पाटील यांच्यासह शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, ग्रामपंचायत सदस्य, पालक, सेवानिवृत्त शिक्षक, युवक, महिला व शिक्षणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नळदुर्ग शहर ब्राम्हण समाज संघटनेच्या अध्यक्षपदी मुकुंद नाईक

**नळदुर्ग, दि.१४ जानेवारी -**

नळदुर्ग शहर ब्राम्हण समाज संघटनेच्या अध्यक्षपदी मुकुंद नाईक यांची तर सचिवपदी संदीप वैद्य यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे. नळदुर्ग शहरात ब्राम्हण समाज संघटनेच्या वतीने गेल्या वर्षभरात विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. माजी अध्यक्ष विनायक अहंकारी व त्यांच्या सहकाऱ्यांनी राष्ट्रपुरुषांच्या जयंतीसह अनेक सामाजिक उपक्रम यशस्वीपणे राबवून संघटनेचा ठसा उमटवला आहे. दि.१२ जानेवारी रोजी नळदुर्ग येथे झालेल्या बैठकीत संघटनेची नवी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यामध्ये कार्याध्यक्षपदी प्रमोद कुलकर्णी, उपाध्यक्षपदी प्रदीप ग्रामोपाध्ये यांची निवड करण्यात आली. कार्यकारिणी सदस्य म्हणून नगरसेवक आकाश कुलकर्णी, उमेश नाईक, सुहास पुराणिक, सचिन भुमकर, मनोज तडवळकर, अजित भुमकर, अजय देशपांडे, सदानंद नाईक, सौरभ रामदासी व पार्थ कुलकर्णी यांचा समावेश आहे.





### एकादशी व मकर संक्रांतीनिमित्त तुळजापुरात इस्कॉनतर्फे मंगल आरती

**तुळजापूर, दि.१४ जानेवारी -**

आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन) व हरे कृष्ण भक्तांच्या वतीने षट्तिला एकादशी व मकर संक्रांतीनिमित्त मंगल आरतीचा कार्यक्रम मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात पार पडला. जिजामाता नगर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात पहाटे ४:४५ वाजता झालेल्या या मंगल आरतीसाठी शेकडो भाविकांनी उपस्थिती लावली. यावेळी मंगल आरती, तुलसी आरती तसेच चैतन्य शिक्षाष्टकम पठण करण्यात आले. त्यानंतर उपस्थित भाविकांकडून 'हरे कृष्ण' महामंत्राचा १६ माळा जप करून घेण्यात आला. पहाटेच्या आल्हादायक वातावरणात मंदिर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता. यावेळी प्रभूजींनी एकादशीचे धार्मिक व आध्यात्मिक महत्त्व विशद केले.



### अंदोरा शाळा व्यवस्थापन समितीची बिनविरोध निवड

**कळंब, दि.१४ जानेवारी -**

तालुक्यातील अंदोरा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच सदस्य पदासाठी सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीत अध्यक्षपदी श्रीकांत कवडे, उपाध्यक्षपदी मनोज तांबारे, तर स्वीकृत सदस्यपदी राजेश तांबारे यांची निवड करण्यात आली. सदस्यपदी पुढील मान्यवरांची बिनविरोध निवड झाली. यात नामदेव तांबारे, गणेश झगडे, अतुल पाटील, तानाजी सिरसट, सुवर्णा तांबारे, ज्योती कदम, वर्षा तांबारे, मीरा बाराते, दिपाली काळे या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे सरपंच बळवंत तांबारे, उपसरपंच दत्तात्रय तांबारे, दत्तात्रय कोळी, आदिनाथ कवडे, गणेश झगडे, महादेव तांबारे, लाला तांबारे, अतुल पाटील, पप्पू कदम आदी मान्यवरांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

## एकादशीनिमित्त तेरमध्ये भाविकांची मोठी गर्दी





गोरोबा काका समाधीस्थळी वारकरी दिंड्यांची उपस्थिती...

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.१४ जानेवारी -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथे षष्ठीला एकादशीनिमित्त भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. तेर हे संत शिरोमणी व वारकरी संप्रदायातील थोर संत गोरोबाकाका यांच्या समाधीचे पवित्र स्थळ असल्याने पहाटेपासूनच दर्शनासाठी भाविकांची रांग लागली होती.

दर एकादशीला गोरोबाकाका मंदिरात धाराशिव जिल्ह्यासह लातूर, बीड, परभणी व सोलापूर या जिल्ह्यांतून वारकरी दिंड्या तसेच भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी येतात.

यंदा एकादशी व मकर संक्रांती एकाच दिवशी आल्याने भाविकांची संख्या विशेष वाढलेली दिसून आली.

वाहतूक कोंडी टाळण्यासाठी तेर-पळसप रोडवर बॅरिकेड्स लावून वाहनांसाठी रस्ता बंद करण्यात आला होता.

वाहनांना गावातून पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्यात आले होते. मंदिर परिसरात ढोकी पोलीस ठाण्याच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

भाविकांची कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी गोरोबाकाका व शिवमंदिर ट्रस्टच्या प्रशासक रूपाली कोरे व व्यवस्थापक साहेबराव सौदागर यांच्या मार्गदर्शनाखाली दर्शन, स्वच्छता व वाहतूक व्यवस्थेची योग्य व्यवस्था करण्यात आली होती.

## धान्य वितरणातील गंभीर प्रकारांबाबत कारवाई कधी?

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१४ जानेवारी -**

गेल्या ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात अनेक ठिकाणी प्रत्यक्ष धान्य वितरण न करता ऑफलाईन शिधापत्रिका वाटप, धान्य दुकानदारांना डावलून शिधापत्रिका विभक्त करणे, तसेच नियमबाह्य पद्धतीने धान्य वितरण केल्याचे गंभीर प्रकार समोर आले आहेत. या संदर्भात कळंब तालुका धान्य दुकानदार संघटनेने प्रशासनाकडे तक्रारी दाखल करूनही प्रशासनाची भूमिका संशयास्पद असल्याची चर्चा सुरू आहे.

तक्रारींच्या अनुषंगाने तहसीलदारांनी चौकशी करून जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडे अहवाल पाठविला असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, त्या अहवालातील निष्कर्ष अद्याप सार्वजनिक न केल्याने संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, संबंधित अधिकारी शिल्पा माळवे आजारी रजेवर गेल्यामुळे पुरवठा विभागाचा अतिरिक्त कार्यभार नायब तहसीलदार गोपाळ तापडिया यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. तथापि, या प्रकरणात दोषींवर ठोस कारवाई होणार की नेहमीप्रमाणे प्रकरण फाईलमध्येच दडपले जाणार, असा थेट सवाल धान्य दुकानदार संघटना तसेच नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

प्रशासनाकडून तातडीने चौकशी अहवाल जाहीर करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत असून, पुढील निर्णयाकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## शेतातील स्प्रिंकलरची चोरी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ जानेवारी -**

कळंब पोलीस ठाण्याच्या हद्दीत शेतातील स्प्रिंकलर साहित्य चोरीप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी तुळसाबाई चंद्रकांत खराटे (वय ५०, रा. भोगजी, ता. कळंब) यांच्या भोगजी शिवारातील शेत गट नं. २७३ मधून जैन कंपनीचे स्प्रिंकलरचे १३ नोझल व २० पाईप, असा एकूण सुमारे २०,००० रुपये किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरी करून नेल्याची घटना घडली. सदर चोरी दि.९ जानेवारी रोजी सायंकाळी घडल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी फिर्यादी तुळसाबाई खराटे यांनी दि.१३ जानेवारी रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास कळंब पोलीस करीत आहेत.

## रूईभर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ३२ वा नामविस्तार दिन उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ जानेवारी -**

स्वामी समर्थ कला व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, रूईभर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांचा ३२ वा नामविस्तार दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व शिक्षणमहर्षी सुभाषदादा कोळगे यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व श्रीफळ वाहून करण्यात आली. यावेळी राम दास कोळगे, राजनारायण कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके, प्राचार्य प्रा. संतोष कपाळे, मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे यांच्यासह प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रशांत कोळगे यांनी केले, तर आभार प्रदर्शन राजाभाऊ लटके यांनी मानले.

## वाशी येथे वाळू चोरी; डंपरसह तीन ब्रास वाळू जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ जानेवारी -**

वाशी पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाळू चोरीप्रकरणी एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रणवीर शेषेराव साळुंके (वय ३३, रा. सातेफळ, ता. केज, जि. बीड) असे आरोपीचे नाव आहे.

फिर्यादीनुसार, आरोपी हा दि. ११ जानेवारी २०२६ रोजी रात्री ९.३० वाजता मांडवा शिवारात वाशी रोडवरील पुलाजवळ डंपर क्र. एमएच ०४ बीयू १७८५ मधून तीन ब्रास वाळू (किंमत अंदाजे ९,००० रुपये) डंपरसह एकूण २,०९,००० रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरी करून वाहतूक करत असताना मिळून आला.

याप्रकरणी फिर्यादी गणेश अंकुश खैरे, नेमणूक पोलीस, पोलीस ठाणे वाशी यांनी दि.१३ जानेवारी रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास वाशी पोलीस करीत आहेत.

## अणदूर येथे जय मल्हार पत्रकार संघाचा दर्पण दिन व दिनदर्शिका प्रकाशन सोहळा संपन्न

जगदीश कुलकर्णी यांना 'आद्य पत्रकार कै. शिवशंकर आण्णा आलुरे स्मृती आदर्श पत्रकार पुरस्कार' प्रदान



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१४ जानेवारी -**

प्रति वर्षाप्रमाणे मकर संक्रांतीचे औचित्य साधून तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील जय मल्हार पत्रकार संघाच्या वतीने दर्पण दिनानिमित्त २०२६ वर्षाची दिनदर्शिका प्रकाशन तसेच अणदूरचे आद्य पत्रकार कै. शिवशंकर आण्णा आलुरे स्मृती आदर्श पत्रकार पुरस्कार सोहळा बुधवार, दि. १४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता हुतात्मा स्मारक सभागृह, अणदूर येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. उमाकांत चन्नशेट्टी हे होते. प्रमुख अतिथी म्हणून निलकंठेश्वर मठाचे मठाधिपती ष. ब्र. शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजी, ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत हागलगुंडे, खंडोबा देवस्थान ट्रस्ट अणदूरचे उपाध्यक्ष अविनाश मोकाशे व सुरेश आलुरे यांची उपस्थिती लाभली.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते जय मल्हार पत्रकार संघाच्या २०२६ या वर्षाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. त्यानंतर पत्रकारितेतील उल्लेखनीय कार्याबद्दल कै. शिवशंकर आण्णा आलुरे यांच्या स्मरणार्थ तुळजापूर येथील पत्रकार जगदीश कुलकर्णी यांना फेटा, शाल, सन्मानपत्र व सन्मानचिन्ह प्रदान करून आदर्श पत्रकार पुरस्काराने गौरविण्यात आले.

